22-03-2025-Dai-04_DH_PAN_20_08_2016-3.qxp 03/21/2025 10:22 PM Page 1

निवडक

पार्सेकर महाविद्यालयात २५ रोजी गोमंतकीय लोकनाट्य महोत्सव

■ टीम दैनिक हेराल्ड

हरमल, दि. २१ : येथील गणपत पार्सेकर शिक्षण शास्त्रमहविद्यालय व कला संस्कृती संचालनालय यांच्या विद्यमाने गोमंतकीय लोकनाट्य महोत्सव, मंगळवार, दि. २५ मार्च रोजी सकाळी ९.३० वाजता संस्थेच्या ज्ञानदा सभागृहात आयोजित केला आहे. या महोत्सवात 'ढोलक भजन' सादरकर्ते श्री रवळनाथ सांस्कृतिक कला मंडळ, पालये,'लोकनाट्य कालो दशावतार' सादरकर्ते माही नाट्यमंडळ, मोर्ले,सत्तरी,'लोकनाट्य जागोर' सादरकर्ते गोपाळकृष्ण कला संगम, प्रीयोळ व 'लोकनाट्य रणमाले' सादरकर्ते श्री सातेरी केळबाय रणमाले पथक, झर्मे सत्तरी यांचे आहे.

डिचोली मतदारसंघ भाजप समिती जाहीर

■ टीम दैनिक हेराल्ड

डिचोली, दि. २१ : भारतीय जनता पार्टी डिचोली मतदारसंघ भाजप मंडळ समिती अध्यक्षपदी डॉ. कौस्तुभ पाटणेकर यांची निवड करण्यात आली आहे. आमदार डॉ. चंद्रकांत शेट्ये, माजी आमदार तथा भाजप नेते सिद्धार्थ कुंकळ्ळ्येकर,प्रभारी संतोष मळीक, नगराध्यक्ष विजयकुमार नाटेकर, वल्लभ साळकर, माजी सभापती राजेश पाटणेकर यांच्या उपस्थितीत डिचोली भाजप मंडळ समितीची घोषणा करण्यात आली. उपाध्यक्षपदी प्रदीप रेवडकर, श्याम मातोंणकर, सपना शिरोडकर तर सरचिटणीसपदी, संजय शेट्ये,संजय म्हापसेकर, सचिवपदी नारायण बेतकीकर शुभलक्ष्मी दीक्षित विदिशा बुगडे तर खजिनदारपदी सुशांत नारूलकर यांची निवड करण्यात आली. सदस्यपदी श्याम शिरोडकर, तुळशीदास गावकर, शेखर परवार, अजित बिर्जे, चंदन परब, अभिजीत तेली, केदार शिरगांवकर,श्रीपाद आमोणकर, संगम पळ, प्रकाश राऊत, धनंजय पळ, अर्चना गायकवाड, सुहासिनी शेट्ये, तृप्ती गाड, आराधना राऊत, सुबत्ता सामंत, कविता काजारी, नरेश गावस, नीलेश परब, नीलम कारापूरकर, विलास पालकर, पद्माकर मळीक, अक्षता मळीक, मनोज साळगावकर यांची सदस्यपदी निवड करण्यात आली. सिद्धार्थ कुंकळ्येकर यांनी आगामी काळात विधानसभा निवडणूक पंचायत व पालिका निवडणूक यासाठी भाजप पक्ष अधिक भक्कम करण्यास भर दिलेला असून अजयभारत सव्वा चार लाख सदस्य केले.

आयपीएलचा आजपासून थरार..!

सलामीला केकेआर, आरसीबी भिडणार : उद्घाटनाला सिनेतारकांचा असणार जलवा; सामन्यावर पावसाचे सावट

कोलकाता, दि. २१ :

इंडियन प्रीमियर लीगचा पहिला सामना गतविजेता कोलकाता नाईट रायडर्स (केकेआर) आणि रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरू (आरसीबी) यांच्यात कोलकाता येथील ईडन गार्डन्स येथे खेळवला जाणार आहे, मात्र, याठिकाणी मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे, ज्यामुळे उद्घाटनाचा हा सामना रद्द होईल की काय अशी भीती सर्वांनाच सतावत आहे.

दोन्ही संघ या हंगामात नवीन कर्णधारांच्या नेतृत्वाखाली खेळणार आहेत. यामध्ये केकेआरच्या कर्णधारपदाची जबाबदारी अनुभवी फलंदाज अजिंक्य रहाणे सांभाळेल, तर आरसीबीच्या नेतृत्वाची धुरा रजत पाटीदारच्या खांद्यावर आहे.

हा सामना भारतीय वेळेनुसार संध्याकाळी ७:३० वाजता सुरू होईल, परंतु हवामान खात्याच्या अहवालानुसार, सामन्यादरम्यान पावसाची शक्यता ४४ टक्के आहे. रात्री ९ ते १० च्या दरम्यान पावसाचा जोर वाढू शकतो, ज्याची शक्यता ५० ते ६० टक्के असल्याचे सांगितले जात आहे. जर पाऊस जास्त काळ चालू राहिला तर सामना रद्द होऊ शकतो. तापमान २३ ते २५ अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याची अपेक्षा आहे, तर वाऱ्याचा वेग ताशी २२ किलोमीटर असेल.

आयपीएलच्या इतिहासातील दोन्ही संघांच्या कामगिरीबद्दल सांगायचे झाल्यास केकेआरचा आरसीबीवर वरचष्मा असल्याचे दिसून येते. दोन्ही संघांमध्ये आतापर्यंत एकूण ३४ सामने खेळले गेले आहेत, त्यापैकी कोलकाता नाईट रायडर्सने २० सामने जिंकले आहेत, तर रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने १४ सामने जिंकले आहेत. ईडन गार्डन्सवर खेळल्या गेलेल्या सामन्यांबद्दल बोलायचे झाले तर, येथेही केकेआरने वर्चस्व गाजवले आहे. या मैदानावर दोन्ही संघांमध्ये एकूण १२ सामने खेळले गेले आहेत, त्यापैकी केकेआरने ८ वेळा विजय मिळवला आहे, तर आरसीबीला फक्त ४ सामने जिंकता आले आहेत.

आयपीएलचा हा पहिला सामना खूप रोमांचक होण्याची अपेक्षा आहे. दोन्ही संघ नवीन कर्णधारांच्या नेतृत्वाखाली येत आहेत, ज्यामुळे सामन्यात नवीन रणनीती आणि वेगवेगळ्या शैली पाहायला मिळतील. तथापि, पावसामुळे खेळात अडथळा येऊ शकतो परंतु जर हवामान स्वच्छ राहिले तर प्रेक्षक हाय-व्होल्टेज सामना पाहू शकतात.

तत्पूर्वी, उद्घाटन सोहळ्यात अभिनेत्री दिशा पटानी, नामवंत गायिका श्रेया घोषाल, करण औलिजा हे आपली कला सादर करणार आहेत. एक लाख क्षमतेच्या इडन गार्डन्स या ऐतिहासिक मैदानावर हा सोहळा आणि त्यानंतर सलामीची लढत रंगणार आहे. उद्घाटन सोहळ्याला संध्याकाळी ६ वाजता सुरूवात होणार आहे.

संभाव्य प्रतिस्पर्धी संघ

केकेआर : अजिंक्य रहाणे (कर्णधार), सुनील नारायण, रिंकू सिंग, आंद्रे रसेल, वरुण चक्रवर्ती, हर्षित राणा, रमनदीप सिंग, वेंकटेश अय्यर, क्विंटन डी कॉक, रहमानउल्ला गुरबाज, एनरिक नोर्किया, अंगकृष रघुवंशी, वैभव अरोरा, मयंक मार्कंडे, रोवमन पॉवेल, मनीष पांडे, स्पेन्सर जॉन्सन, लवनीत सिसोदिया, अनुकुल रॉय, मोईन अली, उमरान मलिक.

आरसीबी : रजत पाटीदार (कर्णधार), विराट कोहली, आणि यश दयाल, लियाम लिव्हिंगस्टोन, फिल साल्ट, जितेश शर्मा, जोश हेझलवूड, रसिक दार, सुयश शर्मा, कृणाल पंड्या, भुवनेश्वर कुमार, स्वप्नील सिंग, टिम डेव्हिड, रोमारियो शेफर्ड, नुवान तुषारा, मनोज भंडागे, जेकब बेथेल, देवदत्त पडिकल, स्वस्तिक चिकारा, लुंगी एनगिडी, अभिनंदन सिंग, मोहित राठी

मेल्वीन रॉड्रिगीस यांचे आज केप्यात व्याख्यान

■ टीम दैनिक हेराल्ड

पर्वरी, दि.२१ : कला, विज्ञान आणि वाणिज्य शासकीय महाविद्यालय केपे येथील एम.ए. कोकणी विभागाच्या वतीने साहित्य अकादेमी पुरस्कार विजेते लेखक मेल्वीन रॉड्रिगीस यांच्या प्रकृतीचो पास या काव्यसंग्रहावर विश्लेषणात्मक चर्चा, तसेच साहित्य अकादेमी आणि कोंकणी साहित्य या विषयावर उद्या दि. २२ मार्च रोजी आयोजित करण्यात आलेले आहे. हे व्याख्यान सकाळी १० वाजता महाविद्यालयाच्या एम.ए.कोंकणी विभागात होईल. सुप्रसिद्ध साहित्यिक मेल्वीन रॉड्रिगीस यांच्या प्रकृतीचो पास या काव्यसंग्रहाचा बी.ए.कोंकणीच्या अभ्यासक्रमात समावेश करण्यात आलेला आहे. त्यानिमित्ताने विद्यार्थ्यांना मेल्वीन रॉड्रिगीस यांच्या अनुभवविश्वाची आणि साहित्य लेखनाची ओळख व्हावी या हेतूने या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आलेले आहे. कोंकणी विभागाच्या प्राध्यापिका जो गोन्साल्वीस यांनी या व्याख्यानाचे संयोजन केलेले आहे. हे व्याख्यान सर्वांसाठी खुले असल्याची माहिती आयोजकांच्यावतीने देण्यात आली असून या व्याख्यानाचा आस्वाद घ्यावा, असे आयोजकांकडून आवाहन करण्यात आलेले आहे.

धारगळमध्ये टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन

■ टीम दैनिक हेराल्ड

पेडणे, दि. २१ : धारगळ प्रीमिअर लीग, दाडेश्वर ट्रॉफी अखिल गोवा व सिंधुदुर्ग मर्यादित सहा षटकांच्या टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन माजी उपमुख्यमंत्री बाबू आजगांवकर यांच्या हस्ते धारगळ मैदानावर झाले.

यावेळी धारगळ सरपंच सतीश धुमाळ, माजी सरपंच व विद्यमान पंचसदस्य अनिकेत साळगावकर, अर्जुन कानोळकर, दाजी शिरोडकर, उपसरपंच दीप्तीषा नारोजी, पंचसदस्य श्री वीर, सामाजिक कार्यकर्ते दिगंबर कानोळकर, शांताराम राऊळ, आबा तळकटकर, केदार नाईक, कृष्णा तालावणेकर, गजानन नाईक, ज्ञानेश्वर परब व राजेंद्र म्हापसेकर आदी उपस्थित होते

धारगळ : येथील दाडेश्वर चषक क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन करताना माजी उप मुख्यमंत्री बाबू आजगावकर. बाजूला धारगळ सरपंच सतीश धुमाळ ,माजी सरपंच तथा विद्यमान पंच अनिकेत साळगावकर व अन्य.

यावेळी बोलताना उपमुख्यमंत्री बाबू आजगांवकर यांनी संधी मिळताच खेळाडूंसाठी क्रीडामैदान बांधून देऊ, असे आश्वासन दिले.

निसर्ग शिक्षण केंद्रातून निसर्गाबाबत मिळते ज्ञान

▶ सरपंच सविता तवडकर

■ टीम दैनिक हेराल्ड

आगोंद, दि. २१ : निसर्ग शिक्षण केंद्र लोकांना निसर्ग आणि संवर्धनाबद्दल शिकण्यास मदत करते, तर राउंड ऑफिस वन आणि वन्यजीव उपक्रमांचे व्यवस्थापन सुधारते, असे प्रमुख पाहुण्या व पैंगीणच्या सरपंच सविता तवडकर यांनी सांगितले.

काणकोण येथील गाल्जीबाग समुद्रकिनाऱ्यावर शुक्रवारी गोवा वन विभाग, वन्यजीव आणि पर्यावरण-पर्यटन दक्षिण गोवा विभाग, दक्षिण गोवा मरीन रेंज यांनी स्थापन केलेल्या निसर्ग शिक्षण केंद्राचे उद्घाटन केल्यानंतर त्या प्रमुख पाहुण्या म्हणून बोलत होत्या.

कार्यक्रमादरम्यान राउंड ऑफिसचेही उद्घाटन प्रमुख पाहुण्यांहस्ते करण्यात आले. यावेळी उपसरपंच सुनील पैंगिणकर, डीसीएफ अंकित कुमार, एसीएफ दामोदर सालेकर आणि इतरांची उपस्थिती होती.

काणकोण : येथे तटरक्षक दलाच्या इमारतीची पायाभरणी करताना सभापती रमेश तवडकर व बाजूला अन्य मान्यवर.

तळपण येथे तटरक्षक दलाच्या इमारतीची पायाभरणी

■ टीम दैनिक हेराल्ड

▶ चावडी येथे प्रशासकीय एक छताखालील इमारत लवकरच : सभापती तवडकर

आगोंद, दि. २१ : तळपण, काणकोण तटरक्षक दलाच्या इमारत एका वर्षात पूर्ण करण्यात येईल. गोवा शांत व सुरक्षित असल्यामुळेच विविध राज्यांतील लोक या ठिकाणी स्थायिक होण्यास प्राधान्य देत आहेत. आगोंद, पाळोळे जगप्रसिद्ध समुद्रकिनारे आहेत. विकासाच्या बाबतीत काणकोण मागे नाही. पुढील दोन वर्षांत एकही काम राहणार नाही. मामलेदार कार्यालयासमोरील जागेत प्रशस्त अशी ५ कोटी रुपये खर्चून इमारत बांधण्यात येणार आहे, असे प्रतिपादन सभापती रमेश तवडकर यांनी केले.

तळपण, काणकोण येथे तट रक्षक पोलीस दलाच्या इमारत बांधकामाची पायाभरणी केल्यानंतर सभापती रमेश तवडकर प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

यावेळी नगराध्यक्ष सारा देसाई, तटरक्षक पोलिस दलाचे अधीक्षक राजू राऊत देसाई, स्थानिक सरपंच सविता तवडकर, उपसरपंच सतीश पैंगीणकर, आगोंदचे सरपंच नीलेश पागी, पंचसदस्य अस्मिता जोशी, महेश नाईक, शिल्पा प्रभुगावकर, सतीश पैंगीणकर, पोलीस उपअधीक्षक सलीम शेख, नगरसेवक हेमंत नाईक गावकर, सायमन रिबेलो, गंधेश मडगावकर, नारसिस्को फर्नांडिस व अन्य उपस्थित होते.

सुरुवातीला तटरक्षक दलाच्या जवानांनी दिलेली मानवंदना सभापती तवडकर यांनी स्विकारली. तद्नंतर नामफलकाला हार घालून व नारळ वाढवून १ कोटी ७२ लाख खर्चून बांधण्यात येणाऱ्या इमारतीची पायाभरणी केली. अधीक्षक राऊत देसाई यांनी व्यासपीठावरील मान्यवरांचे स्वागत व प्रास्ताविक केले. तर बेंतो मास्कारेन्हास, प्रितेश फळदेसाई, सुदेश वेळीप यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. आन्तानियो ग्रावो यांनी सदर इमारत प्रकल्पाची सविस्तर माहिती दिली. स्थानकाचे निरीक्षक नवलेश देसाई यांनी बांधकाम ठेकेदार यांना पुष्पगुच्छ देऊन सन्मानित केले.

सरपंच सविता तवडकर यांनी गोवा राज्य सुप्रसिद्ध पर्यटनस्थळ असल्यामुळे या ठिकाणी येणाऱ्या पर्यटक व स्थानिक जनतेला सुरक्षा देण्याकरता तटरक्षक दल सुसज्ज असणे गरजेचे आहे. सागरी यंत्रणा सक्षम असल्यामुळे शांतता प्रस्थापित होत असल्याचे सांगितले. सूत्रसंचालन शिरीष पै यांनी केले तर सलीम शेख यांनी आभार मानले.

हरमल सरपंचपदी अनुपमा मयेकर यांची बिनविरोध निवड

■ टीम दैनिक हेराल्ड

हरमल, दि. २१ : येथील हरमल पंचायतीच्या सरपंचपदी प्रभाग एकच्या पंचसदस्य अनुपमा प्रमोद (हरेश) मयेकर यांची बिनविरोध निवड झाली. यावेळी गटविकास खात्याचे भिवा ठाकूर यांनी निर्वाचन अधिकारी म्हणून काम पाहिले व पंचायत सचिव सुभाष कांबळी यांनी त्यांना सहकार्य केले.

यावेळी उपसरपंच सोनाली माज्री, पंच सुशांत गावडे, दिव्या गडेकर, भिकाजी नाईक, रजनी इब्रामपुरकर उपस्थित होते. दरम्यान, सरपंचपदी बिनविरोध निवड केल्याबद्दल सहकारी पंचसदस्यांचे आभार व्यक्त केले. मांद्रे मतदारसंघाचे आमदार जीत आरोलकर यांच्या सहकार्याने पंचायतक्षेत्राचा विकास करण्याचा आपला प्रयत्न राहील. त्यासाठी सगळ्यांना विश्वासात घेऊन प्रलंबित कामे मार्गी लावली जातील, असे नव निर्वाचित सरपंच अनुपमा मयेकर यांनी व्यक्त केले. यावेळी माजी सरपंच तथा विद्यमान पंच रजनी इब्रामपुरकर यांनी अभिनंदन केले व आपण सरपंचपदी असताना, गिरकरवाडा भागातील प्रश्नांचा ताण मोठा होता, त्यावेळच्या उपसरपंच अनुपमा मयेकर यांनी आपणास चांगली साथ दिली होती. त्यामुळे आम्ही सगळे पंच निश्चितपणे त्यांच्या पाठीशी राहणार असे पंच इब्रामपुरकर तसेच भिकाजी नाईक, संतान फर्नांडिस यांनी सांगितले. यावेळी दिलीप वायंगणकर,माजी सरपंच प्रगती प्रमेश मयेकर,प्रमेश मयेकर,संजय नाईक,प्रकाश रामजी,रघुनाथ रामजी, लिबान फर्नांडिस आदी उपस्थित होते.

हरमल : हरमल पंचायतीच्या सरपंचपदी अनुपमा मयेकर यांची बिनविरोध निवड झाली. यावेळी उपसरपंच सोनाली माज्री, दिव्या गडेकर, रजनी इब्रामपुरकर, भिकाजी नाईक, सुशांत गावडे व संतान फर्नांडिस.

पर्यावरणाच्या रक्षणासाठी विद्यार्थ्यांचा सहभाग महत्त्वाचा

प्राचार्य डॉ. नामदेव गावस : विविध स्पर्धांचे बक्षीस वितरण उत्साहात

■ टीम दैनिक हेराल्ड

साखळी, दि. २१ : निसर्गाचे संवर्धन म्हणजे मानवी जीवनाचे संवर्धन होय. म्हणूनच पर्यावरणाच्या रक्षणासाठी विद्यार्थ्यांनी सक्रिय पावले उचलावीत, पर्यावरणाच्या रक्षणासाठी विद्यार्थ्यांचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. नामदेव गावस यांनी केले.

कला, विज्ञान आणि वाणिज्य शासकीय महाविद्यालय, साखळी येथील निसर्ग क्लब समितीच्या वतीने आयोजित केलेल्या वनस्पती प्राणी संवादावर रील मेकिंग स्पर्धा आणि पक्ष्यांची घरटी बनविणे स्पर्धांच्या बक्षीस वितरणावेळी प्राचार्य नामदेव गावस बोलत होते. यावेळी आयक्यूएसीचे संचालक डॉ. वैभव चिंदरकर, निसर्ग क्लब समितीच्या सदस्य वर्षा साईल, संयोजक डॉ. आरती पानशेकर आदी मान्यवर उपस्थित होते.

साखळी : विजेत्या विद्यार्थ्यांसोबत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नामदेव गावस. सोबत आयक्यूएसीचे संचालक डॉ. वैभव चिंदरकर, स्पर्धा संयोजक डॉ.आरती पानशेकर व मान्यवर.

यावेळी आयक्यूएसीचे संचालक डॉ. वैभव चिंदरकर यांनी आपल्या मनोगतात सहभागी विद्यार्थ्यांच्या अथक प्रयत्नांचे आणि विद्यार्थ्यांनी मांडलेल्या नाविन्यपूर्ण कल्पनांने कौतुक केले. तर वर्षा साईल यांनी विद्यार्थ्यांनी अशा अर्थपूर्ण कार्यक्रमांमध्ये सहभागी होऊन आपले व्यक्तिमत्त्व सर्वांगीण बनवावे, असे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हेमा सावंत यांनी केले. दीपक कुभांर यांनी छायाचित्रणाच्या माध्यमातून कार्यक्रमाचे संस्मरणीय क्षण टिपले. निसर्ग क्लबच्या संयोजक डॉ.आरती पानशेकर यांनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी अथक प्रयत्न केले.

यावेळी घेण्यात आलेल्या वनस्पती-प्राणी संवादावर आधारित रील मेकिंग स्पर्धेत भावार्थ धोंड, योहान मकानदार, इरान बोकरे आदी विद्यार्थ्यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक पटकाविला. तर पक्ष्याची घरटी बनविण्याच्या स्पर्धेत आलिया खान, समीक्षा काणेकर आणि योगीता गावकर आदी विद्यार्थ्यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक पटकाविला.

निसर्गभान येण्यासाठी स्पर्धांचे आयोजन : डॉ. पानशेकर

विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणीय जाणीव विकसित करणे आणि निसर्ग संवर्धनात विद्यार्थ्यांनी महत्त्वाची भूमिका पार पाडावी, निसर्गाबाबतच्या जबाबदाराचे भान विद्यार्थ्यांना यावे, तसचे निसर्ग आणि विद्यार्थी यामधील नाते अधिक दृढ व्हावे, यासाठी वनस्पती प्राणी संवादावर रील मेकिंग स्पर्धा आणि पक्ष्यांची घरटी बनविणे स्पर्धांचे आयोजन करण्यात आलेले होते, अशी माहिती आपल्या मनोगतात स्पर्धा संयोजक डॉ. आरती पानशेकर यांनी दिली.

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक १९९ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल - १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल - १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 199 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .